# मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट तथा आयुक्त, कृषि यांचे अध्यक्षतेखालील सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) तयार करणेसाठी समुदाय आधारित संस्था (CBO) निवड समिती दि.१६/१२/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

मा.बाळासाहेब कृषि व्यवसाय व ग्रामिण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट तथा आयुक्त कृषि यांचे अध्यक्षतेखाली दि.१६/१२/२०२१ रोजी सविस्तर प्रकल्प अहवाल (FPP) तयार करणेसाठी समुदाय आधारीत संस्था (CBO) निवड समितीची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.

सदर बैठकीत विषयनिहाय झालेली चर्चा व त्याअनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे :-

<table>
<tr><th>विषय क्र.</th><th>विषय</th><th>निर्णय आणि कार्यवाहीचा मुद्दा</th><th>कार्यवाही कोण करावी</th><th>समय मर्यादा</th></tr>
<tr><td>१</td><td>प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा निहाय सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांबाबत.</td><td>१) स्मार्ट अंतर्गत, प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांच्या विभाग प्रमुखांच्या शिफारशीने प्राप्त समुदाय आधारीत संस्थांना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेस समितीने प्राथमिक मान्यता दिली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.
<table>
<tr><th rowspan="2">अ क्र</th><th rowspan="2">यंत्रणेचे नाव</th><th rowspan="2">अर्ज निवडीचे लक्षांक (संख्या)</th><th rowspan="2">यापूर्वी निवड समितीने FPP तयार करणे साठी प्राथमिक मान्यता दिलेल्या सीबीओ संख्या</th><th rowspan="2">यंत्रणेने निवडी साठी शिफारस केलेल्या पात्र अर्जांची संख्या</th><th colspan="2">पीसीएमयुच्या पडताळणीनुसार</th></tr>
<tr><th>प्राथमिक मान्यता दिलेली अर्ज संख्या</th><th>त्रुटी पूर्ततेसाठी परत केलेल्या अर्जांची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>Agri</td><td>९००</td><td>३९७</td><td>९२</td><td>६८</td><td>२४</td></tr>
<tr><td>२</td><td>VSTF</td><td>७२</td><td>२२</td><td>०२</td><td>०२</td><td>००</td></tr>
<tr><td colspan="2">एकुण</td><td>९७२</td><td>४१९</td><td>९४</td><td>७०</td><td>२४</td></tr>
</table>
उपरोक्तप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणानिहाय ७० समुदाय आधारित संस्थांना सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करणेकरिता प्राथमिक मान्यता देण्यात आली. प्राथमिक मान्यता दिलेल्या ७० समुदाय आधारित संस्थांची यादी सोबत जोडली आहे. सदर मान्यता ही या इतिवृत्ता सोबतच्या प्रपत्र-“ब” मधील अटी व शर्तीनुसार देणेत आली आहे. तसेच उर्वरीत २४ संस्थांच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळून आल्याने किंवा जिल्हा लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्याने याविषयी संचालक, आत्मा यांना प्रपत्र “क” नुसार पुर्तता करणेबाबत सुचित करण्यात आले.</td><td>पीआययू, कृषि व VSTF</td><td>तातडीने</td></tr>
<tr><td></td><td></td><td>२) नियामक मंडळाने पीआययू निहाय, जिल्हानिहाय लक्षांकास मान्यता दिलेली आहे. काही जिल्ह्यांमध्ये लक्षांकापेक्षा जास्त पात्र सीबीओ आहेत तर काही जिल्ह्यांमध्ये लक्षांकाच्या तुलनेत फारच</td><td>संबंधित पीआययू</td><td>तातडीने</td></tr>
</table>

| विषय क्र. | विषय | निर्णय आणि कार्यवाहीचा मुद्या | कार्यवाही कोण करावी | समय मर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | कमी सीबीओ पात्र आहेत. याविषयी नव्याने नियामक मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात यावा. तोपर्यंत नियामक मंडळाने मंजूर केलेल्या जिल्ह्याच्या लक्षांकापेक्षा जास्तीचे प्रस्ताव प्राथमिक मान्यतेसाठी सादर करु नयेत. | | |
| | | ३) ज्या सीबीओंना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेली आहे अशा सीबीओंनी जर खरेदीदार म्हणून इतर सीबीओंशी करार केला असेल तर अश्या सीबीओंना नवीन खरेदीदारासमवेत सामंजस्य करार करण्याचे सूचित करावे. यापूर्वी प्राथमिक मान्यता दिलेल्या सीबीओ मध्ये खरेदीदार म्हणुन दूसरा सीबीओ असल्यास नवीन खरेदीदारासमवेतच्या सामंजस्य करारासह सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावेत. | संबंधित पीआययू | तातडीने |
| | | ४) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांमार्फत लवकरात लवकर स्थानिक सनदी लेखापाल व सनदी अभियंत्यांच्या मदतीने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून संबधीत पीआययु स्तरावर सादर होतील असे पहावे. तसेच पीआययुंनी संस्थांकडून प्राप्त सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करुन तातडीने स्मार्ट प्रकल्पास सादर करावे. | पीआययू कृषि व VSTF | तातडीने |
| | | ५) तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे मूल्यांकन करणेसाठी प्रकल्पामार्फत Independent Assesment Panel (IAP) नेमणूकीची प्रक्रिया करावी. | पीसीएमयू | तातडीने |
| | | ६) पीआययू पशुसंवर्धन, एमएसआरएलएम व माविम यांचेमार्फत सदर बैठकीत लक्षांकानुसार एकाही संस्थेची शिफारस केलेली नाही. तरी संबंधीत विभाग प्रमुखांनी प्रकल्पास गती देवून प्रस्ताव सादर करावेत. | पीआययू AHD, MSRLM व MAVIM | तातडीने |

उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(धीरज कुमार, भा.प्र.से)
प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे

जा.क्र/स्मार्ट/सी.नि.स.बै/इतिवृत्त / १२५ /२०२२
दिनांक:- ०९/०२/२०२२

प्रत:- १) विभाग प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व यांना माहीतीस्तव सादर.
२) नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, सर्व यांना कार्यवाहीस्तव अग्रेषित.

पीआययू – कृषी

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांची यादी.

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हा अ.क्र. | सीबीओचे नाव |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | १ | समता फार्मर्स प्रोडूसर कंपनी ता. मुरबाड |
| २ | | २ | बिरसा आदिवासी फार्मर्स प्रोडूसर कंपनी ता मुरबाड |
| ३ | नाशिक | १ | एम एम बी फार्मर्स प्रोडूसर कंपनी ता सटाणा |
| ४ | | २ | कृषिरत्नक्स ओरगनिक फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.मालेगाव |
| ५ | | ३ | मल्हार ॲग्रो फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. दिंडोरी |
| ६ | | ४ | कापसे पाटील कृषि प्रोड्युसर कंपनी लि. ता.येवला |
| ७ | | ५ | टीआयओ फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता मालेगाव |
| ८ | धुळे | १ | काटवन परिसर फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. साकी |
| ९ | | २ | पांझरकान फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. साक्री |
| १० | | ३ | काननदी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. साक्री |
| ११ | | ४ | महुमाळ फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. साक्री |
| १२ | पुणे | १ | आय के एस फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.खेड |
| १३ | | २ | भीमाशंकर आसाणेआंबेगाव प्रोड्युसर कंपनी लि. ता..आंबेगाव |
| १४ | | ३ | श्री भीमाशंकर ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता..आंबेगाव |
| १५ | | ४ | व्हर्चुअल ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता.जुन्नर |
| १६ | | ५ | ग्लोबल फ्रेश फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.आंबेगाव |
| १७ | | ६ | सस्टेन ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. दौंड |
| १८ | | ७ | बना हेल्थ फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.इंदापूर |
| १९ | सोलापूर | १ | महाकृषि फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.सोलापूर |
| २० | | २ | निंबस फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता माळशिरज |
| २१ | | ३ | साई समृद्धी प्लांट सायन्सेस ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता.बार्शी |
| २२ | सांगली | १ | आदर्श ॲग्रोटेक फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. जत |
| २३ | | २ | पिंपळपान ओर्गानिक फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. |
| २४ | | ३ | श्री संवेद फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. |
| २५ | बीड | १ | एल एस के फार्मर्सप्रोड्युसर कंपनी लि. ता.गेवराई |
| २६ | जालना | १ | गोदापूर्णा ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. जालना |
| २७ | | २ | अजिंठा वेरूळ फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |
| २८ | | ३ | सुपर अग्रो हायटेक प्रोड्युसर कंपनी लि. ता. |
| २९ | | ४ | मस्त्स्योदारी ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हा अ.क्र. | सीबीओचे नाव |
|---|---|---|---|
| ३० | | ५ | ॲग्रो गोल्ड फर्म टेक प्रोड्युसर कंपनी लि. ता. |
| ३१ | | ६ | जामुवंत ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |
| ३२ | | ७ | प्युअर ॲन्ड पेरफेक्ट ॲग्रीटेक प्रोड्युसर कंपनी लि. ता. जालना |
| ३३ | | ८ | मस्त्स्योदारी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |
| ३४ | | ९ | आम्ही बळीराजा मस्त्स्योदारी प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |
| ३५ | | १० | मुंजाळ ब्रदर्स फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. अंबड |
| ३६ | | ११ | हरियाली ग्रीनव्हेज प्रो.कंपनी लि. अंबड |
| ३७ | | १२ | एस सातोना फार्मर्स मस्त्स्योदारी प्रोड्युसर कंपनी लि. ता. |
| ३८ | | १३ | अभिराय मंदोदरी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. जालना |
| ३९ | | १४ | दशरथबाबा फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. भोकरदन |
| ४० | | १५ | वालसावंगी अग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. भोकरदन |
| ४१ | | १६ | संत वामनभाऊ शेतकरी स्वयंसहायता गट (दुधना फार्मर प्रो.कं.लि.) ता. अंबड |
| ४२ | | १७ | फार्मेशन फार्मर्स मस्त्स्योदारी प्रोड्युसर कंपनी लि. ता. बदनापूर |
| ४३ | | १८ | जीवरेखा अग्री प्रोड्युसर कंपनी लि. ता. टेंभूर्णी |
| ४४ | उस्मानाबाद | १ | भैरवनाथ ॲग्रो भैरवनाथ किसन कृषि प्रोड्युसर कंपनी लि. ता. कळंब |
| ४५ | नांदेड | १ | धर्माबाद ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. धर्माबाद |
| ४६ | | २ | कृष्णमोती प्रोड्युसर कंपनी लि. ता. देगलूर |
| ४७ | | ३ | कै संभाजी पवार फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.नायगाव |
| ४८ | | ४ | कृशीटेकफार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. देगलूर |
| ४९ | | ५ | शिखर शिंगणापूर ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. नायगाव |
| ५० | | ६ | श्रावणी श्रेयशी फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. बिलोली |
| ५१ | | ७ | नई दिशा फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. नायगाव |
| ५२ | | ८ | राजे मल्हारराव होळकर ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. कंधार |
| ५३ | | ९ | शिवलिंग बादशहाशेतकरी उत्पादक कंपनी ता बिलोली |
| ५४ | | १० | गणराज फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.कंधार |
| ५५ | | ११ | लक्ष्मीमाता फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.मुखेड |
| ५६ | | १२ | बळीवंश ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता.देगलूर |
| ५७ | | १३ | भंडारे फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.धर्माबाद |
| ५८ | | १४ | गोदामाई रुरल फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता.धर्माबाद |
| ५९ | | १५ | शेवन्तामाता फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.हदगाव |
| ६० | | १६ | पावडे फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. नांदेड |

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हा अ.क्र. | सीबीओचे नाव |
|---|---|---|---|
| ६१ | | १७ | ग्रीन ओझोन ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. मुखेड |
| ६२ | | १८ | श्रुती माउली फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.बिलोली |
| ६३ | | १९ | रामचंद्रराव जाधव फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता.किनवट |
| ६४ | अमरावती | १ | गुरु गजानन ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ता. धामणगाव |
| ६५ | बुलढाणा | १ | रुज अग्रोटेक प्रोड्युसर कंपनी लि. ता मेहेकर |
| ६६ | नागपूर | १ | कन्हान अग्रो व्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. ता. पारशिवनी |
| ६७ | | २ | रामसागर फार्मर प्रोड्युसर कंपनी लि. |
| ६८ | गडचिरोली | १ | सुभगोन फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लि. ता. मुलचेरा |

(धीरज कुमार, भा.प्र.से)
प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे

पीआययू - VSTF

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या समुदाय आधारित संस्थांची यादी.

| अ.क्र. | जिल्हा | जिल्हा अ.क्र. | सीबीओचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | १ | सारखणी फार्मर्स प्रोड्यूसर कं. ली.किनवट नांदेड |
| २ | अहमदनगर | १ | कोपर्डी कृषिरत्न फार्मर प्रो. कं. लि. कर्जत, अहमदनगर |

(धीरज कुमार, भा.प्र.से)
प्रकल्प संचालक, स्मार्ट, पुणे

## प्रपत्र-ब
## सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्राथमिक मान्यता दिलेल्या संस्थासाठीच्या अटी व शर्ती

१) सदर प्राथमिक मान्यता केवळ सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी असून कोणत्याही रूपाने उपप्रकल्प राबविण्यासाठीची मान्यता अथवा पूर्वसंमती नाही.

२) सर्व अटींची पूर्तता करणाऱ्या समुदाय आधारित संस्थांचे सविस्तर प्रकल्प अहवाल, स्मार्ट प्रकल्पास उपलब्ध आर्थिक लक्षांक व प्रकल्पाच्या उदिदष्टांची पूर्तता यावर सविस्तर प्रकल्प अहवालांना मान्यता देणे अवलंबून असेल.

याशिवाय, सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी खालील अटींची पूर्तता करणे अनिवार्य राहील.

३) स्मार्ट प्रकल्पातून समुदाय आधारित संस्थेमार्फत प्रस्तावित प्रकल्प किंमतीच्या अधिकतम ६०% पर्यंत अनुदान, व्यवहार्यता आंतरनिधीच्या (Viability Gape Fund) स्वरुपात दिले जाईल. उर्वरित निधी संस्थेने स्वत: उभा करावायाचा आहे. यासाठी संस्था बँका व अन्य वित्तीय संस्थाकडून कर्ज घेऊ शकतील तथापि, कर्ज घेणे बंधनकारक राहणार नाही.

४) फलोत्पादन पिकांच्या मूल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रति समुदाय आधारित संस्था, अनुदान मर्यादा एकुण प्रकल्प किंमतीच्या ६० % व अधिकतम रु. ३.०० कोटी असेल, सदर प्रकल्प अहवालात शितगृह, पिकवण गृह या बाबी प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राहय धरली जाणारी अधिकतम क्षमता पुढीलप्रमाणे असेल-

अ) शितगृह (Cold Storage) - अधिकतम १००० मे. टन.

ब) पिकवण गृह (Ripening Chamber) - अधिकतम १५० मे. टन.

क) पूर्व शितकरण गृह ( Pre Cooling Chamber) -५० मे. टन.

५) फलोत्पादन पिकाव्यतिरिक्त अन्य शेत पिकांच्या मूल्यसाखळी उपप्रकल्पासाठी प्रती समुदाय आधारित संस्था, अनुदान मर्यादा एकुण प्रकल्प किंमतीच्या ६०% व अधिकतम रु. २.०० कोटी असेल, या प्रकल्प अहवालात गोदाम बांधकाम प्रस्तावित केल्यास त्याची अनुदानासाठी ग्राहय धरली जाणारी अधिकतम साठवण क्षमता २००० मे.टन असेल.

६) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये, पिक काढणोत्तर पायाभूत सूविधासाठींच्या (Post Harvest Infrastructure) बाबींवर किमान प्रकल्प खर्चाच्या ७०% खर्च प्रस्तावित करावा. Post Harvest Infrastructure Includes the Post Harvest Machinery, Primary Processing, Cleaning, Grading, Secondary Processing, Tertiary Processing, Packaging etc.) तसेच गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठीचे तंत्रज्ञान आणि अन्य पिक काढणीपूर्व सोयी सूविधांसाठी अधिकतम एकुण प्रकल्प खर्चाच्या २५% खर्च प्रस्तावित करता येईल. याबरोबरच प्रकल्प कार्यान्वयन खर्च ५% प्रस्तावित करता येईल.

७) सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये केवळ नव्याने उभ्या करावयाच्या प्रकल्प अहवाल मंजूरीनंतर राबवावयाच्या बाबींचा समावेश असावा.

८) सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित घटाकांची अनुदान परिगणना प्रचलित शासकीय योजनांच्या मापदंडानुसार केले जाईल. उदा. फलोत्पादन पिकांच्या प्रकल्पासाठी केंद्र पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत मापदंडानुसार अनुदानाची परिगणना करण्यात येईल आणि गोदाम बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे मापदंड ग्राहय धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या औजारासाठी केंद्र पुरस्कृत कृषि अभियांत्रिकीकरण उप अभियानातील मापदंड ग्राहय धरण्यात येतील. सर्व प्रकारच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संबंधित जिल्हयासाठीचे अनुसूचित

दर वापरून (DSR) सविस्तर अंदाजपत्रके तयार करणे अभिप्रेत आहे. सविस्तर प्रकल्प अहवालात प्रस्तावित बाबींसाठी कोणतेही शासकीय योजनेत मापदंड उपलब्ध नसतील अशा बाबीसाठी व अन्य अपवादात्मक परिस्थितीत स्मार्ट प्रकल्पामार्फत मापदंड निश्चित करण्यात येतील.

९) उपरोक्त पध्दतीने सविस्तर प्रकल्प अहवाल सनदी अभियंता (Chartered Engineer) सनदी लेखापाल यांच्या मदतीने समुदाय आधारित संस्थांनी तयार करावेत आणि अशा प्रकल्प अहवालाना आणि त्यात प्रस्तावित बाबींना स्वतंत्र तांत्रिक मान्यतेची आवश्यकता राहणार नाही. तथापि, प्रकल्पामार्फत सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करण्यात येईल.

१०) प्रकल्पाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिलेल्या नमुन्यात केवळ माहिती सादर करणे म्हणजे सविस्तर प्रकल्प अहवाल होत नाही. सनदी लेखापाल व सनदी अभियंता यांच्या सहाय्याने प्रकल्पाची आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करावा लागेल. अशा सविस्तर प्रकल्प अहवालाचे विशिष्ट निकषांच्या आधारे गुणांकन करुन केवळ स्पर्धाक्षम सविस्तर प्रकल्प अहवालांची उपलब्ध भौतिक व आर्थिक तरतूदींच्या अधिन राहून अंतिम मंजूरीसाठी निवड केली जाईल.

११) संस्थेच्या संचालक मंडळात एका कुटूंबातील एका पेक्षा जास्त संचालक नसावेत.

१२) संस्थेने प्रस्तावित केलेल्या एकुण प्रकल्प खर्चाच्या किमान ५ टक्के भाग भांडवल (Paid up capital) संस्थेकडे जमा असावे.

१३) संस्थेस (FPC) होणाऱ्या नफयापैकी किमान २५ टक्के नफा भागधारकांना लाभांश स्वरुपात थेट लाभ हस्तांतरणाने (Direct Beneficiary Transfer-DBT) वाटप करणेबाबत लेखी हमी व सर्वसाधारण सभेचा ठराव सादर करावा. प्रकल्प मंजूरीनंतर नफा झाल्यास अशा लांभाशाचे वरीलप्रमाणे वाटप झाल्याशिवाय स्मार्ट प्रकल्पातून व्दितीय व तृतीय अनुदान हप्ता वितरित होणार नाही.

१४) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करतेवेळी समुदाय आधारित संस्थेच्या भागधारकांमध्ये प्रकल्प अंमलबजावणी कालावधीमध्ये अनुदानाचा अंतिम हप्ता मिळणेपूर्वी संस्थेमध्ये खालीलप्रमाणे भागधारकांचे प्रमाण करण्यात येईल असे लेखी अभिवचन द्यावे लागेल.

अ) अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी -८० %

ब) महिला शेतकरी -३०%

क) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती- जिल्हयातील शेतकरी संख्येच्या प्रमाणात

ड) संचालक मंडळात महिलांची संख्या किमान २०%

१५) सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना संस्थेकडे प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारी जागा उपलब्ध असावी. अशी जागा संस्थेच्या नावावर असावी. किंवा संस्थेने २९ वर्षाचा दुय्यम निबंधकाकडील नोंदणीकृत भाडे करारनामा सादर करावा.

१६) याशिवाय स्मार्ट प्रकल्पाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा, प्रकल्पाची संपादन पुस्तिका, प्रकल्पाची वित्तीय व्यवस्थापन पुस्तिका यामधील तरतूदी अटी व शर्तींचा सविस्तर प्रकल्प अहवाल असावा.